


# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ३९६ वा सोमवार दि २२ जून २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# उद्धव ठाकरेंनी प्रचंड स्नेह दिला, मातोश्रीबद्दल एकही शब्द वाईट नको, पक्ष सोडताना ओमराजे निंबाळकर यांची भावनिक प्रतिक्रिया

**धाराशिव**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी आज आपल्या मतदारसंघात जावून कार्यकर्त्यांशी चर्चा केली. ओमराजे निंबाळकर यांनी जवळपास दोन ते तीन तास कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा केली. यानंतर त्यांनी माध्यमांसमोर येऊन भूमिका मांडली. ओमराजे निंबाळकर यांनी अखेर आपला निर्णय जाहीर केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत आपण प्रवेश करणार असल्याचं ओमराजे निंबाळकर यांनी जाहीर केलं. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपल्या कार्यकर्त्यांना यश मिळालं नाही, यासोबत मतदारसंघातील विकासकामे आणि वडिलांच्या खुनाचा खटल्याच्या प्रकरणात न्याय मिळावा, अशा विविध कारणांमुळे आपण सत्तेत जाण्याचा निर्णय घेतल्याचं ओमराजेंनी जाहीर केलं. यावेळी ते पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचं नाव घेणं विसरले नाहीत.नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत धाराशिवमध्ये सगळे कार्यकर्ते लढले. पण एकाही पंचायत समितीत, नगरपालिकेत आम्हाला यश मिळू शकलं नाही. अतिशय चांगलं काम करणारे कार्यकर्ते सुद्धा या निवडणुकीत वाईट पद्धतीने पराभूत झाले. मी असेन, आमचे सहकारी असतील, आम्ही २४ तास सर्वसामान्यांना वेळ देण्याचं काम केलं आहे. याचे सर्वसामान्य माणसं साक्षीदार आहेत. आम्ही कधी कामात कमी पडलो नाहीत. पण दुर्दैवाने सत्तेत नसल्यामुळे या पराभवाला सामोरं जावं लागलं. आज सगळ्यांच्या माध्यमातून निर्णय घेतला आहे की, शिवसेना पक्षात आम्ही जाणार आहोत. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आम्ही काम करणार आहोत, असं ओमराजे निंबाळकर यांनी जाहीर केलं. ङ्गङ्घ्या पाठिमागची पार्श्वभूमी आहे. ज्या कारणाने मी माझं सार्वजनिक आयुष्य सुरु केलं. वाईट वृत्तीची लोकं कुठल्याही पद्धतीने राजकाराच्या पटलावर राहायला नको. २० वर्षे अविरतपणे न्यायालयीन प्रक्रिया चालली. आम्हाला या निकालाकडे फार मोठ्या अपेक्षा होत्या. राजकीय वैमनस्य होतं हे न्यायालय मान्य करत आहे. पण दुर्दैवाने कळंबोली पोलीस ठाण्याच्या तपासाला बेस करुन निकाल अतिशय दुर्दैवी होता. अशा पद्धतीने या निकालाचं दु:ख आमच्या कुटुंबाला सहन करावं लागलंङ्घङ्घ, असं ओमराजे म्हणाले. यामध्ये एक माणूस सक्षमपणे उभा होता, त्यांनाही ते पटलेलं नव्हतं. काल ज्या पद्धतीने निकाल आला त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बोलणं झालं. त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबतही माझं बोलणं करुन दिलं. आम्ही त्यांना इतकीच विनंती केली की, आम्ही जो संघर्ष करतोय, फक्त न्याय मागतोय. तो न्याय मिळवून द्या अशी विनंती केली. एकनाथ शिंदेंनी स्वत: समोर येऊन भूमिका मांडली. केसच्या मेरिटवर न्याय मिळावा. कुठलाही पक्ष असला तरी अशा वृत्तीला रोखण्यासाठी ओमराजेला कोणीही रोखू शकत नाही अशी भूमिका ओमराजेंनी मांडली. आदरणीय उद्धवजी, आदरणीय आदित्यजी, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मला प्रचंड स्नेह लाभला. त्यांचा आशीर्वाद लाभला. त्यांचे प्रेम लाभले आहे. मला वाटतं, माझ्या मनात, माझ्या मनात कधीही कुणाबद्दलही



वाईट शब्द आलेले नाहीत आणि येणारही नाहीत. मी मगाशी आमच्या सर्व सैनिकांना सांगितलं की, समोरुन कशीही कमेंट आली तरी मातोश्रीबद्दल आपल्याकडून एकही शब्द जायला नको, अशी विनंती मी आमच्या सर्व कार्यकर्त्यांना केलेली आहे. मी त्यांचे आभार व्यक्त करतो, अशी भावना ओमराजे निंबाळकर यांनी यावेळी व्यक्त केली. माझा पुढचा राजकीय प्रवास हा सर्वसामान्य माणसाच्या जीवनात आनंदाचे क्षण आणण्यासाठी, त्याला सुखाचे क्षण देण्यासाठी कायम स्वरुपी, जसा याआधी अविरतपणे काम करत आलो आहे, त्याच पद्धतीने काम करत राहीन हे वचन देतो, असं ओमराजे निंबाळकर म्हणाले.

# पक्षादेशामुळे ऐनवेळी काँग्रेसची माघार, पण बापाच्या निर्णयाचा फटका पोराला बसला; ठाकरेसेनेच्या कृष्णा पाटील आष्टीकरांचा दारुण पराभव

**नांदेड**

: हिंगोली जिल्ह्याचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या बंडामुळे राज्याचं लक्ष लागलेल्या नांदेड विधान परिषद निवडणुकीचा निकाल समोर आला आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून निवडणुकीच्या रिंगणात असलेले खासदार आष्टीकर यांचे सुपुत्र कृष्णा पाटील आष्टीकर यांचा दारुण पराभव झाला आहे. आष्टीकर यांना केवळ ८४ मते मिळाली आहेत. तर माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे विश्वासू तथा भाजप उमेदवार अमर राजुरकर यांनी ३३९ मते मिळवत त्यांनी विजयाची हॅट्रिक साधली आहे. शिवाय २३ मते बाद झाल्याची माहिती देखील समोर आली आहे. दरम्यान, या निवडणुकीत मुलाचा पराभव हा खासदार नागेश पाटील आष्टीकर यांना मोठा धक्का मानला जात आहे. नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. एकूण ४५२ नगरसेवक मतदारांपैकी ४५१ जणांनी मतदान केले. महाविकास आघाडीकडून कृष्णा पाटील आष्टीकर, महायुतीकडून अशोक चव्हाण यांचे विश्वासू अमर राजुरकर आणि वंचितकडून नगरसेवक प्रशांत इंगोले हे निवडणुकीच्या रिंगणात होते. सुरुवातीपासून नांदेडची निवडणूक चर्चेची ठरली होती. काँग्रेसकडून उमेदवारी दाखल केलेल्या रामदास पाटील सोमठाणकर यांना शेवटच्या क्षणी पक्षाच्या आदेशामुळे माघार घ्यावी लागली. तर अपक्ष अर्ज दाखल केलेल्या खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे सुपुत्र कृष्णा पाटील यांना महाविकास आघाडीकडून पुरस्कृत उमेदवार जाहीर करण्यात आले. दरम्यान, आज नियोजन भवन येथे मतमोजणी प्रक्रिया पार पडली. भाजपच्या अमर राजुरकर यांना ३३९ मते मिळाली, कृष्णा आष्टीकर यांना ८४ मते आणि वंचितचे प्रशांत इंगोले यांना केवळ ५ मते मिळाली आहेत. विशेष म्हणजे अमर राजुरकर यांनी निवडणूक जिंकून हॅट्रिक साधली आहे. २०१० मध्ये काँग्रेसमध्ये असताना त्यांची बिनविरोध निवड झाली होती. त्यानंतर २०१६ मध्ये ४३ मतांनी विजय मिळवला होता. दरम्यान, अमर राजुरकर पहिल्यांदा भाजपकडून निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. आजच्या विजयानंतर भाजपकडून जल्लोष करण्यात आला. काँग्रेसकडे ९२ संख्याबळ असताना १९ संख्याबळ असलेल्या शिवसेना ठाकरे गटाला नांदेडची जागा सुटली. त्यामुळे उमेदवारी दाखल केलेल्या काँग्रेसचे रामदास पाटील सोमठाणकर यांना माघार घ्यावी लागली. महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये चूरस निर्माण झाली असताना मतदानाच्या दोन दिवसापूर्वी ऑपरेशन टायगरची चर्चा सुरु झाली आणि खासदार नागेश पाटील आष्टीकर हे शिवसेना शिंदे गटात सामील होणार असल्याच्या बातम्या



धडकल्या. त्यामुळे काँग्रेससह शिवसेना आणि राष्ट्रवादी शरद पवार गटातील नगरसेवक संभ्रमात पडले होते. महाविकास आघाडीच्या उमेदवाराची देखील धाकधुक वाढली होती. आपला विजय निश्चित असल्याचा दावा करणाऱ्या कृष्णा पाटील आष्टीकर यांना मात्र ऑपरेशन टायगरमुळे फटका बसला. अपेक्षेप्रमाणे ८४ मते महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मिळाली. मुलाचा पराभव खासदार पित्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

# जिनोम प्रकल्पाचा पितामह

बरोबर २६ वर्षांपूर्वी २० जून २००० रोजी विज्ञानक्षितिजावर एक अलौकिक घटना घडली! एका बहुराष्ट्रीय, प्रदीर्घकालीन, महाखर्चिक, अतिमहत्त्वाकांक्षी, महासंशोधन प्रकल्पाच्या निष्कर्षांची घोषणा करण्यात आली! तो एवढा महत्त्वाचा प्रकल्प होता की अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन आणि ब्रिटनचे पंतप्रधान टोनी ब्लेअर यांनी एकाच वेळी वॉशिंग्टन आणि लंडनमधून ही संयुक्त घोषणा केली. यापूर्वी असे कधी घडले नव्हते. बिल क्लिंटन यांच्याबरोबर ही घोषणा करताना या महाप्रकल्पातील दोन प्रमुख शास्त्रज्ञ हजर होते. सरकारी प्रकल्पाचे नेतृत्व करणारे फ्रान्सिस कॉलिन्स आणि सेलेरा जिनोमिक्स या खासगी कंपनीतून हा प्रकल्प यशस्वी करणारे डॉ. जे. क्रेग व्हेन्टर! हा प्रकल्प म्हणजे ह्युमन जिनोम प्रोजेक्ट. नुकतेच क्रेग व्हेन्टर वयाच्या ७९ व्या वर्षी काळाच्या पडद्याआड गेले. अनेक वेळा नोबेल पारितोषिकासाठी नामनिर्देशन होऊनसुद्धा नोबेल हुकलेले शास्त्रज्ञ! एक अक्षरशः अफाट, अचाट, बंडखोर, वादळी व्यक्तिमत्त्व! माणसाच्या प्रत्येक पेशीत ४६ गुणसूत्रे असतात. प्रत्येक गुणसूत्र डीएनएच्या धाग्याने बनलेले असते माणसाच्या पेशीत असलेला समग्र डीएनएचा संच म्हणजेच जिनोम. डीएनए हा अ‍ॅडेनाईन, ग्वानाईन, थायमाईन, सायटोईन या चार मुळाक्षरांना आलटून पालटून जोडून बनलेला असतो. या संपूर्ण डीएनएवरील अ‍ॅडेनाईन, ग्वानाईन, थायमाईन, सायटोईन या चार रासायनिक मुळाक्षरांचा अनुक्रम शोधून काढणं हे ह्यूमन जिनोम प्रोजेक्टचे ध्येय होते. यासाठी डीएनए सिक्वेन्सिंग तंत्रज्ञान वापरले जाते. आपल्या पेशीतील डीएनएमध्ये जवळजवळ ३.२ अब्ज अशी रासायनिक मुळाक्षरे असतात. जिनोमवरील या चार रासायनिक मुळाक्षरांच्या क्रमवारीचा पहिला खर्डा या दिवशी जाहीर केला! ही क्रमवारी म्हणजे माणसाच्या आयुष्याची पटकथा. क्रेग व्हेन्टर यांनी आयुष्यात फक्त ह्युमन जिनोम प्रोजेक्ट एवढेच काम केले असते तरी ते अजरामर झाले असते. मग ते क्रेग व्हेन्टर कसले! आयुष्यभर ते विज्ञानाची अत्युच्च शिखरे एकापाठोपाठ एक सर करीतच राहिले. आयुष्याच्या अखेरपर्यंत हा माणूस झपाटल्यासारखा संशोधनकार्य करीत होता. प्रत्येक संशोधन प्रकल्पामध्ये ते सरधोपटमार्गाने, मळलेल्या वाटेने कधीही जात नसत. ह्यूमन जिनोम प्रोजेक्टचं उदाहरण घेऊ या. हा सरकारी प्रकल्प १९९० साली सुरू झाला. अब्जावधी डॉलर्स त्यावर खर्च केले. क्रेग व्हेन्टर यांनी १९९८ मध्ये सेलेरा जिनोमिक्स नावाची स्वतःची खासगी कंपनी स्थापन करून या प्रकल्पात उडी घेतली. काळाच्या पुढे पाहणाऱ्या या शास्त्रज्ञाने अ‍ॅप्लाईड बायोसिस्टीम या कंपनीने नुकतीच बाजारात आणलेली स्वयंचलित डीएनए सिक्वेन्सिंग मशीन्स मोठ्या प्रमाणात वापरली. या सिक्वेन्सिंग मशीन्सचे ते जगातील पहिले ग्राहक होते. कम्प्युटर आणि सुपर कम्प्युटरची मदत घेतली आणि केवळ दोन वर्षांत आणि कितीतरी पटीने कमी खर्चात २००० साली सरकारी प्रकल्पाच्या खांद्याला खांदा लावून बिल क्लिंटन यांच्याकडून यशस्वीतेची घोषणा केली! या प्रकल्पाच्या बाबतीत सरकारी कंपनी आणि क्रेग व्हेन्टर यांची खासगी कंपनी यांच्यात तगडी स्पर्धा होती. शेवटी सामना सामंजस्याने बरोबरीत सुटला! क्रेग व्हेन्टर यांनी शोधून काढलेल्या जिनोमच्या क्रमवारीला ङ्गसायन्सफ या जगप्रसिद्ध जर्नलमध्ये स्थान मिळाले तर सरकारी प्रकल्पातून शोधून काढलेल्या जिनोमच्या क्रमवारीला ङ्गनेचरफ या दुसऱ्या जगप्रसिद्ध संशोधन पत्रिकेत स्थान मिळाले!



या आधी १९९५ साली दि इन्स्टिट्यूट फॉर जिनॉमिक रिसर्च या त्यांनीच स्थापन केलेल्या कंपनीमध्ये क्रेग व्हेन्टर यांनी हिमोफायलस इन्फ्लुएन्झे नावाच्या जिवाणूच्या जिनोमची क्रमवारी जगात सर्वप्रथम शोधून काढली. जिनोमची क्रमवारी शोधून काढलेला जगातील हा पहिला जिवाणू. २००० साली ड्रोसोफिला मेलॅनोगॅस्टर नावाच्या फळमाशीच्या जिनोमची क्रमवारी त्यांनीच जगात पहिल्यांदा शोधून काढली! सेलेरा जिनॉमिक्स या त्यांच्याच कंपनीमध्ये त्यांनी हा पराक्रम केला. जिनोमची क्रमवारी शोधून काढलेला कीटक गटातील पृथ्वीतलावरील हा पहिला कीटक म्हणजे ही फळमाशी! कंपन्या तरी किती स्थापन कराव्यात या माणसाने? सेलेरा जिनॉमिक्स, दि इन्स्टिट्यूट फॉर जिनामिक रिसर्च, जे क्रेग व्हेन्टर इन्स्टिट्यूट, ह्यूमन लाँगेविटी इनकार्पोरेशन, सिंथेटिक जिनॉमिक्स, डिप्लॉयड जिनोमिक्स वगैरे वगैरे. खऱ्या अर्थाने उद्योगपती-शास्त्रज्ञ म्हणता येईल असे हे अचाट, धाडसी, धडाडीचे व्यक्तिमत्त्व अनेक शास्त्रज्ञ कल्पनाही करू शकणार नाहीत एवढे ते श्रीमंत होते. त्यांच्याकडे सॉसेरर नावाची स्वतःची खासगी मालकीची दहा लाख डॉलर्स किमतीची आलिशान नौका (यॉट) होती! तिचा नुसता देखभालीचा वार्षिक खर्च ३ लाख डॉलर्स होता.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिवसाई युनिव्हर्सल ज्ञानपीठच्या विद्यार्थ्याची राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी



जनसंचलन/बुलढाणा

जळगाव येथे १० ते १५ जून २०२६ दरम्यान आयोजित महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशन यांच्या द्वारा आयोजित राज्यस्तरीय कब क्लास बॉक्सिंग स्पर्धेत शिवसाई युनिव्हर्सल ज्ञानपीठ स्कूलचा इयत्ता पाचवीतील विद्यार्थी मोहम्मद अरमान याने अंडर-११ मुले, ३६-३८ किलो वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात मोहम्मद अरमान याने परभणीच्या खेळाडूवर मात केली. दुसऱ्या सामन्यात छत्रपती संभाजीनगरच्या खेळाडूचा पराभव करून अंतिम फ ेरीत प्रवेश मिळवला. अंतिम सामन्यात नागपूरच्या खेळाडूविरुद्ध अत्यंत चुरशीची लढत देत त्याने आपल्या कौशल्याची छाप पाडली. सामना ३-२ अशा अत्यंत निकटच्या गुणफरकाने संपला आणि त्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. मोहम्मद अरमान हा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्याद्वारा सुरू असलेल्या जिल्हा बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतो .याला राष्ट्रीय प्रशिक्षक मोहम्मद सुफियान यांचे मार्गदर्शन लाभत असून त्यांच्या प्रशिक्षणाखाली त्याने हे यश संपादन केले आहे. अरमानची मेहनत, शिस्त, जिद्द आणि प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळे त्याने राज्यस्तरावर उल्लेखनीय कामगिरी नोंदवली. या यशामुळे विद्यालयाचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल केले असून मोहम्मद अरमानच्या कामगिरीचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल शिवसाईचे परिवाराचे सर्वेसर्वा श्री. दत्तात्रय लहाने व शिवसाई युनिव्हर्सल ज्ञानपीठ चे प्राचार्य प्रमोद मोहरकर, शिक्षकवृंद तसेच शिवसाई परिवाराने मोहम्मद अरमान आणि त्यांचे प्रशिक्षक मोहम्मद सुफियान यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेज मध्ये योग दिन साजरा



जनसंचलन/बुलढाणा

मॉडेल डिग्री कॉलेज येथे आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रात्यक्षिके करून योग दिन साजरा करण्यात आला मॉडेल डिग्री कॉलेज मधील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आंतरराष्ट्रीय योग दिनाचा आयोजन आज २१ जून रोजी करण्यात सकाळी ७:०० वा. करण्यात आले होते मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ अण्णासाहेब म्हळसणे यांनी योग दिना संदर्भात मार्गदर्शन केलं आरोग्यदायी जीवनासाठी योगाचे महत्त्व सांगितले. याप्रसंगी ❊योगा फॉर हेल्दी एजिंग❊ या वर्षाच्या थीम नुसार प्रत्येकाने आपल्या निरोगी आयुष्यासाठी दैनंदिन जीवनात किमान एक तास तरी योग प्राणायम आणि आसने यासाठी द्यावा असे विचार डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी यावेळी व्यक्त केले तज्ञ योग प्रशिक्षक प्रा. अरुण एस. रिंढे व प्रा. सौ. सुनीता गायकी यांनी विविध आजारांवर योग प्राणायम आणि विविध आसनं यांचे महत्व प्रात्यक्षिक सादर करून सांगितले.
या प्रसंगी डॉ.. मनोज डांगे, प्रा. शिल्पा इंगळे पाटील, प्रा. शिला रोकडे, प्रा. दिलीप माने, प्रा. गुलाबराव सोनोने, प्रा. चंद्रशेखर भांदक्कर आणि शिक्षकेतर कर्मचारी रूपाली गुडधे उपस्थित होते.

# कलकत्ता येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत हजारो नागरिकांनी केला सामूहिक योगभ्यास....

जनसंचलन/बुलढाणा

१२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कलकत्ता येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत सकाळीच हजारो नागरिकांनी योगभ्यास केला . ‌‌योग केवळ जीवनशैलीसाठीच नव्हे, तर जगाच्या अधिक चांगल्या भविष्यासाठी आवश्यक आहे,‌‌ असं मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलं आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कोलकात्यातील रेड रोड येथे आयोजित मुख्य कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगाचं महत्त्व अधोरेखित केलं. योग ही मानवी चैतन्याची अभिव्यक्ती असून तो सर्वांना जोडणारा आणि संतुलित, निरोगी व तणावमुक्त जीवनाचा मार्ग असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. सामूहिक योगाभ्यास ‌‌निरामय वार्धक्यासाठी योग‌‌ या वर्षाच्या संकल्पनेवर भर योगाला जागतिक स्तरावर मिळालेल्या वाढत्या मान्यतेचा उल्लेख यावेळी करण्यात आला . स्वामी विवेकानंदांच्या शिकागोतील ऐतिहासिक उद्गारांपासून सुरू झालेला भारताच्या योगशक्तीचा प्रवास आज ‌वंदे मातरम्‌पासून ‌वंदे योगपर्यंत सशक्तपणे पोहोचला आहे अस मत केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केल आदरणीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांमुळे आज योग १८० हून अधिक देशांमध्ये जागतिक आरोग्य जनआंदोलन बनला आहे. या गौरवशाली परंपरेचा अभिमान बाळगत, योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवूया असे आवाहन केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी यावेळी व्यक्त केला



आदरणीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार आल्यानंतर पहिल्याच वर्षी जागतिक पातळीवर २१ जून हा जागतिक योग दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात झाली. भारतीय परंपरा आणि संस्कृतीवर जागतिक पातळीची उमटलेली ही एक मोहोरच होती. आज जगभरात योग साधनेचा झालेला प्रचार आणि प्रचार हे निश्चितच आजच्या जागतिक योग दिनाचं यश म्हणावं लागेल असेही ते म्हणाले कोलकत्ता येथे झालेल्या योग दिनाच्या कार्यक्रमांमध्ये योग साधक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

# पिंपरी सरहद्द येथे युवकाची निर्घृण हत्या; चार जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल

**जनसंचलन-बुलढाणा**

रिसोड तालुक्यातील पिंप्री सरहद येथील बळीराजा पेट्रोल पंपाजवळ २४ वर्षीय युवकाची निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी शिरपूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), ३५१(२), ३५१(३), ३(५) (जुनी कलमे ३०२, ५०६, ३४ भा.दं.वि.) अन्वये चार जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतक अभिषेक विष्णू वाघ (वय २४, रा. उकीरखेडा, ता. रिसोड) याला १८ जून २०२६ रोजी सायंकाळी जेवणासाठी बाहेर जाण्याचे सांगून पिंपरी सरहद येथील बळीराजा पेट्रोल पंपाजवळ नेण्यात आले. तेथे जुन्या वादाच्या कारणावरून कोणत्यातरी जड हत्याराने डोक्याच्या मागील बाजूस वार करून त्याची हत्या करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी मृतकाचे वडील विष्णू गोविंदा वाघ (वय ४९) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आनंद विनोद मवाळ, प्रतिक संतोष हुंबाड, पवन गजानन दांडदे (सर्व रा. महागाव, ता. रिसोड) तसेच शुभम शेषराव अवचार (रा. अंजनी बु., ता. मेहकर, जि. बुलढाणा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीमध्ये नमूद केल्याप्रमाणे, सुमारे तीन वर्षांपूर्वी पैशाच्या कारणावरून वाद झाला होता. तसेच महिनाभरापूर्वी कामावर येण्याच्या कारणावरून धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्याच रागातून ही घटना घडल्याचा दावा फिर्यादीने केला आहे. दरम्यान, ही घटना शिरपूर पोलीस स्टेशन हद्दीतील मेहकरमालेगाव राष्ट्रीय महामार्गावरील ग्राम पिंप्री सरहद येथील बळीराजा पेट्रोल पंपाजवळ १८ जून रोजी सायंकाळी घडली. मृतकाच्या वडिलांनी दिलेल्या जबानी रिपोर्टमध्ये संबंधित संशयितांची नावे नमूद असल्याने शिरपूर पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावून घेतले आहे. पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान संबंधितांकडून उडवाउडवीची उत्तरे मिळत असून सध्या त्यांना पीसीआर (पोलीस



कोठडी रिमांड) प्रक्रियेखाली ठेवण्यात आले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून पोलीस विविध अंगांनी चौकशी करत आहेत. मृतकावर प्रथम सिग्मा हॉस्पिटल आणि त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात उपचार करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. वाशिम पोलीस विभागाच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक इमरानखान पठाण करीत असून तपासाच्या आधारे पुढील कारवाई सुरू आहे.

# जानेफळ पोलिसांची धडक मोहीम; वडाळी-पारखेडमध्ये अवैध दारूच्या हातभट्ट्या उद्ध्वस्त, दोन अटके!

**जनसंचलन/बुलढाणा**



जानेफळ पोलीस स्टेशन जानेफळच्या हद्दीत अवैध हातभट्टी दारू निर्मिती आणि विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी धडक मोहीम सुरू केली आहे. १९ जून २०२६ रोजी ग्राम वडाळी आणि ग्राम पारखेड येथे पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकून एकूण १९,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून दोन जणांवर गुन्हे दाखल केले आहेत.पहिली कारवाई मेहकर तालुक्यातील वडाळी येथे करण्यात आली. येथे आरोपी लक्ष्मण शालीग्राम लठाड (वय ३६) याच्याकडून ७ लिटर हातभट्टी दारू, १०० लिटर गुळमिश्रित मोहा सडवा आणि दारू बनवण्याचे साहित्य असा एकूण ७,१५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी जानेफळ पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नंबर २०६/२०२६, महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (क), (फ), (ड) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.दुसरी कारवाई पारखेड येथे करण्यात आली. येथे आरोपी श्रीचंद मांगु जाधव (वय ५१) याच्या ताब्यातून १० लिटर हातभट्टी दारू, २०० लिटर गुळमिश्रित मोहा सडवा आणि निर्मितीचे साहित्य असा एकूण १२,०५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गुन्हा रजि. नंबर २०८/२०२६, कलम ६५ (फ), (ड) अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. ही धडक कारवाई मेहकरचे उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक आदिनाथ मोरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या मोहिमेत पीएसआय संतोष जाधव, एचसी अतुल पवार, पीसी कृष्णा निकम, पीसी विष्णू जगताप आणि अंमलदार माधव काळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अवैध दारू धंद्यांविरुद्ध अशीच कडक कारवाई पुढेही सुरू राहील, असा इशारा पोलिसांनी दिला असून नागरिकांनी याविषयी माहिती देण्याचे आवाहन केले आहे.




# वर्हाडाच्या गाडीत अँगल गाडीत घुसल्याचा थरार अनुभवला वऱ्हाड्यांनी.

**जनसंचलन/बुलढाणा**

डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ग्राम हिवरा साबळे फाट्यावर वीस जूनच्या दुपारी साडेतीन वाजता दरम्यान मेहकर कडून डोणगाव कडे येणारे मालवाहू वाहन मधे असलेले लोखंडी अँगल क्रुझर च्या केबिनमध्ये घुसले यामध्ये काही वराडी जखमी झाले.

डोणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ग्राम हिवरा साबळे फाट्या जवळ मुंबई नागपूर राज्य महामार्गावर २१ जुनच्या दुपारी साडेतीन वाजता दरम्यान मेहकर कडून डोणगाव कडे मालवाहू वाहन एम एच ४७ वाय ३९ ७६ तर डोणगाव कडून मेहकर कडे वऱ्हाड घेऊन जाणारे क्रुझर वाहन एम एच ३७ ए एच २७२२ समोरासमोर धडक झाली छोट्या मालवाहू वाहनांमध्ये वीस ते पंचवीस फुटी अँगल घेऊन चालले होते विशेष म्हणजे दोन्ही बाजूने सहा ते सात फुट अँगल बाहेर निघालेले ज्याला पाहूनच अंगावर काटा येतो असे हे अँगल घेऊन जाणारे वाहन क्रुझर समोर येऊन धडकले ज्यामध्ये लग्न साठी वऱ्हाड चालले होते याच समोरच्या बाजूला महिला सुद्धा बसलेल्या होत्या या अपघातामध्ये महिला व लहान लेकरं अपघातग्रस्त झाले पाहणाऱ्यांनी अपघाताची स्थिती पाहता अंगावर शहारे आले अशाप्रकारे जोगिनी वाहतूक कितपत योग्य आहे दहा फुटी गाडी व त्यात पंचवीस फुटी अँगल याची वाहतूक कोणत्या नियमाने सुरू होती यावर परिवहन विभागाने कारवाई करण्याची मागणी सुज्ञ नागरिकाकडून होत आहे विशेष म्हणजे अपघाताची माहिती मिळतात डोणगाव पोलीस स्टेशनचे कर्मचारी त्या ठिकाणी पोहोचले होते त्यांनी त्या ठिकाणी बचाव कार्य केले मात्र या जीवघेण्या अपघातावर कोणत्याच प्रकारे कारवाई झालेली नाही अपघातामधील जखमी महिलावर यांना मेहकर येथील खाजगी दवाखान्यांमध्ये उपचार करण्यात आले.

एकीकडे वाहनातून गज किंवा पाईप अशा प्रकारे जीव घेणे साहित्य यांची वाहतूक वाहनाची लांबी जेवढी आहे तेवढीच करता येते मात्र दहा फुटी वाहनातून २५ फ ुटाचे अँगल वाहन नेणे कितपत योग्य आहे अशा वाहनावर परिवहन विभागाने कारवाई करणे गरजेचे असून पोलिसांना सुद्धा अशा वाहनावर कारवाई संबंधी सूचना पोलीस विभागाने व परिवार देणे गरजेचे आहे.

दैनिक निडर निर्भीड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भीड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८